# मुंबई विद्यापीठ

## विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणूकांबाबतचे प्रकटन

या प्रकटनाद्वारे असे जाहिर करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा व अभ्यासमंडळांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(o), २८(२)(p) व २८(२)(s) नुसार अधिसभेवर अनुक्रमे १० प्राचार्य, ६ संस्था प्रतिनिधी व ३ विद्यापीठ अध्यापक तसेच कलम ४०(२)(c) नुसार अभ्यासमंळावर ३ महाविद्यालयीन विभाग प्रमुख यांच्या निवडणूकीसाठी तात्पुरत्या स्वरूपातील मतदारयादया विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावरील Election Portal किंवा www.musenate.in या संकेतस्थळावर तसेच अवलोकनार्थ सहायक कुलसचिव, निवडणुक विभाग, रूम नं. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे उपलब्ध होत्या.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम, २०१७ मधील परिनियम क्र. ८(४) नुसार दिनांक २ डिसेंबर २०१७ रोजी प्रसिध्द झालेल्या प्राचार्य, व्यवस्थापन परिषद आणि विद्यापीठ अध्यापक तसेच अभ्यास मंडळासाठी विभाग प्रमुखांच्या मतदार याद्या वर आलेल्या आक्षेपांची तपासणी करून कुलसचिवांनी दुरूस्त मतदार याद्या जाहिर केल्या. दिनांक ९ डिसेंबर, २०१७ पासून विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावरील Election Portal किंवा www.musenate.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अवलोकनार्थ सहायक कुलसचिव, निवडणुक विभाग, रूम नं. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे उपलब्ध आहेत.

कुलसचिवांनी दुरूस्त केलेल्या मतदार याद्या बाबत काही विवाद असतील तर मतदार याद्या विरोधातील अपिल हे दुरूस्त मतदार याद्या प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसाच्या आत म्हणजेच **१३ डिसेंबर,२०१७ पर्यंत सायंकाळी ५.०० वा. पर्यंत** (नमुना **"A"**) सहायक कुलसचिव, निवडणुक विभाग, रुम नं. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई–४०० ०३२ येथे सादर करावेत. याबाबतची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर अपिल मा. कुलगुरूंकडे दाखल करण्यात येईल आणि मा.कुलगुरूंचा निर्णय अंतिम राहील.

**( वि.सु.- शनिवार दिनांक ९ डिसेंबर आणि रविवार दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी निवडणूक विभाग मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई–३२ निवडणूकी संबंधीत कामासाठी सुरू राहिल.)**

**डॉ. दिनेश कांबळे**
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

क्र. नि.वि./आयसीडी/२०१७-१८/
दि. : ८ डिसेंबर, २०१७

Scanned by CamScanner